**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेश नारायण लंगडे
एफ-१३, सद्‌गुरू अपार्टमेंटस्, कांती क्लिनीक शेजारी, — अपीलकर्ता
सिताराम नगर, सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, — उत्तरवादी
सांगली, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,
सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजेश नारायण लंगडे
एफ-१३, सद्‌गुरू अपार्टमेंटस्, कांती क्लिनीक शेजारी,
सिताराम नगर, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा वालचंद्र अभियांत्रिकी महाविद्यालय,
सांगली, जि. सांगली प्रा. ए. आर. यार्दी

**जन माहित्ती अधिकारी** तथा वालचंद्र अभियांत्रिकी महाविद्यालय,
सांगली, जि. सांगली प्रा. श्रीरंग पांडुरंग चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |

८ **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

वालचंद्र अभियांत्रिकी महाविद्यालयात अकौटंट म्हणून अन्य व्यक्तीला दिलेली पदोन्नती व कनिष्ठ लिपिक पदावरील सर्वांना निवड समितीने दिलेले गुण या संदर्भातील माहिती देता येत नसल्याचे आपल्याला जन माहिती अधिकारी यांनी कळविले. निवड प्रक्रियेत व सेवा ज्येष्ठता यादीत नियमांचे पालन झालेले नाही, त्यामुळे आपल्यावर अन्याय झाला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. राजेश नारायण लंगडे यांनी लेखी व तोंडी केली.

गुणानुक्रमे तयार केलेल्या सेवा ज्येष्ठता यादीची प्रत श्री. लंगडे यांना देण्यात आली. मुलाखतीमध्ये घेतलेले गुण गोपनीय असल्याने देता येत नसल्याचे कळविले, असे जन माहिती अधिकारी, वालचंद्र अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांनी सांगितले. पदोन्नतीची कार्यवाही संस्था स्तरावर होत नाही. सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक आर्हता व गोपनीय अहवाल यांचा विचार करुन तंत्रशिक्षण संचालनालयाने अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासाठी गठित केलेल्या समितीने पदोन्नती / पदबदली बाबतचा निर्णय घेतला. या अनुषंगाने सर्व माहिती श्री. लंगडे यांना देण्यात आली आहे. समितीने केलेल्या निवडीनुसार यादी तयार करण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसः नमूद केले.

संस्थेकडील माहिती श्री. लंगडे यांना देण्यात आली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. निवडप्रक्रिया योग्य पध्दतीने पार पाडली गेली नाही, अशी अपीलकर्त्यांची तक्रार असल्याचे त्यांच्या निवेदनावरून स्पष्ट होते. ही तक्रार वेगळ्या न्यायासनापुढे मांडावी लागेल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा निर्णय करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.१०.२००९

M.T.E. SOCIETY'S
**WALCHAND COLLEGE OF ENGINEERING**
VISHRAMBAG, SANGLI. (M.S.) 416 415
Website: walchandsangli.ac.in

| | | | |
|---|---|---|---|
| ☎ OFFICE | : 2300383 | FAX | : 91-233-2300831 |
| APPLIED MECH | : 2300714 | CIVIL | : 2300330 |
| ELECTRICAL | : 2300933 | LIBRARY | : 2300357 |
| MECHANICAL | : 2300716 | RECTOR | : 2300243 |
| ELECTRONICS | : 2304470 | COMPUTER SCI. | : 2301327 |
| T & P OFFICER | : 2300015 | Email: walchand@rediffmail.com | |


वाअम/माहिती अधिकार २००५/ 102

दिनांक : ०७-०४-२००७

प्रति,
श्री. राजेश नारायण लंगडे
एफ १३, सितारामनगर., सांगली

विषय : माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार मागितलेली माहिती.

संदर्भ : आपले दिनांक १२-०३-२००७ चे पत्र.

महोदय.

वरील विषयास अनुसरून आपणास खालील गोष्टी कळवू इच्छीतो.

1) आपण आपल्या पत्राद्वारे एकूण १८ बाबीसंबंधी मुद्देनिहाय माहिती मागिलेली आहे. यापैकी अ. क्र. ५, ६, ११, १४ या बाबीसंबंधीची माहिती गोपनिय असलेने ती आपणास देता येणार नाही.

2) इतर बाबीसंबंधीची माहिती या महाविद्यालयाच्या कार्यालयातील अस्थापना विभागामध्ये उपलब्ध होवू शकेल. आपण याच कार्यालयामध्ये सेवेत असून त्या विभागातील संबंधित लिपीकांच्या व तुमच्या सोयीने ती पाहू शकता.

3) आपण मागितलेली कांही माहिती आपणास माहित आहे. आपण या कार्यालयातच सेवेत असलेने हया माहितीशी आपला दैनंदिन कामकाजात संबंध आला आहे.

कळावे,

WALCHAND COLLEGE OF ENGG. SANGLI

माहिती -अधिकारी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भालचंद्र धनराज देवकर
मु.पो.लोणीदेवकर, ता.इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर ता. इंदापूर, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत लोणी देवकर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर ता. इंदापूर, जि.पुणे श्री. आर.एम. साळुंके

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत लोणी देवकर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. एस.एस. काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २६.११.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मौजे लोणी देवकर ग्रामपंचायतीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. भालचंद्र धनराज देवकर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांच्याकडे मागितली होती. विस्तार अधिकाऱ्यांनी हा अर्ज जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, लोणी देवकर यांच्याकडे वर्ग केला. ग्रामसेवकांनी आपल्याला १४ महिने १८ दिवसांनी व अपुरी माहिती दिली, असे श्री. देवकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे.

श्री. देवकर यांनी सन १९८५ ते २००६ या काळातील माहिती मागितली होती. माहितीची मागणी विस्तृत असूनही ३० दिवसांत त्यांना माहिती पुरविली. प्रथम अपील त्यांनी दाखल केलेले नाही व एका मुद्दयाची माहिती उपअभियंता (छोपावि), पंचायत समिती, इंदापूर यांच्याशी संबंधित होती. ती नंतर देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. एस.एस. काळे यांनी केले. श्री. देवकर यांनी मूळ अर्जात लोणी देवकर ग्रामपंचायतीच्या अंतर्गत असलेली माहिती मागितली होती. संपूर्ण तालुक्याची माहिती गट विकास अधिकाऱ्यांनी द्यावी, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मूळ अर्जानुसार त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर श्री. आर.एम.साळुंके यांनी नमूद केले. ते रास्त असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झाल**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय हणमंत जाधव
मु.पो.जत, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, जत जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.४.२००९ |

३ **उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, जत जि. सांगली श्रीमती अरूणा दत्तात्रय इटाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.८.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता अनुपस्थित राहिल्यामुळे दि.२९.४.२००९ रोजी अपिलाचा सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसही अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मुद्दे निहाय दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी श्रीमती अरूणा दत्तात्रय इटाई यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. एका चालकाला काम न देता बसून पगार दिला गेला आणि एकाच वाहनावर दोन चालकांची नियुक्ती केल्याचे उघड झाले, असे श्री. विजय हणमंत जाधव यांनी आयोगाकडील अपील अर्जात म्हटले आहे. माहितीच्या अधिकारातील अपिलाचा हा विषय होऊ शकत नाही. हे लक्षात घेता अपीलकर्त्याने अकारण अपील केल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.१०.२००९

ALL INDIA

NGO

# HUMAN RIGHTS ASSOCIATION (AIHRA)

(मानवी हक्क, दिल्ली) Reg. No. # S/20441/89

India's first registered Human Rights & Non profitable Organization

"FOR THE PROTECTION OF HUMAN RIGHTS"

National off.: R-178, Street # 8, Ramesh Park, Laxmi Nagar, Delhi 110 092
Admn. Off.: 1/24, 2nd Floor, St. # 2, Lalita Park, Laxmi Nagar, Delhi 110 092
West Mah. H. Off.: II nd Floor, Above Ajit Bank, Pune-Satara Road, Dhanakwadi, Pune 411 043
Tel.: (020) 24364709, 9322321445, 9422501911
C/o Sai Prakash, Mangal Karyalaya, Vidya Nagar, Jath 416 404., Tal. Jath. Dist. Sangli Phone (02344) 246266

GENERAL
Kolkata
BOARD
Justice R. N. Mishra
Justice P. N. Bhagwati
Justice H. S. Pathak
Justice M. N. Venkatachaliah
Justice H. S. Mirdha
ORGANISING SECRETARY
Pandena (Canada)
(USA)
MAHARASHTRA STATE CHIEF
SECRETARY & LEGAL ADVISOR
CHIEF SANGLI
SECRETARY
SECRETARY
SECRETARY
ADVISER
(Bombay Highcourt)
REPORTING OFFICER

Date :

[२]

[७] जि. प. मे. समाजकल्याण विभागाकडील चालकाची ज्या वहानावर नियुक्ती झालेली आहे त्याच वहानावर कराडकर चालकाची बदलीने नियुक्ती केलेली आहे काय ? कराडकर हजर झाल्यानंतर श्री. नाटेकर चालक यांना त्यांच्या बदली ठिकाणी मुक्त केले काय ? केले असल्यास तसा खुलासा करावा नसल्यास तसा खुलासा करावा.

[८] कराडकर चालक हजर झाल्यापासून त्यांची कोणत्या वहानावर नियुक्ती केली ? सदर चालक कराडकर हे गेल्या ६ महिन्यापासू -कोणत्या वहानावर काम करीत असतात त्या वहानाचा नंबर देण्यात यावा आणि काम करीत नसतील तर त्यांना काम करता वेतन देण्याची व्यवस्था जि. प. च्या सक्षम अधिका-यांनी केलेली आहे काय ?

[९] चालक श्री. नाटेकर यांचा वर्ग जि. पकडील समाजकल्याण विभाग कडे झालेला आहे काय ? असल्यास तसा तसा तपशिल द्यावा नसल्यास तसा तपशिल द्यावा.

[१०] ज्या चालकाची नियुक्ती गट विकास अधिकारी वर्ग-१ याचे वहानावर झालेली आहे त्या वहानावर त्याची नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत. ?

[चार] माहिती टपालाद्वारे हवी की व्यक्तीशः - व्यक्तीशः

[पांच] टपालाद्वारे [माहिती] हवी असल्यास- व्यक्तीशः

[४] अर्जदार दारिद्री रेषेखालील आहे काय ?:- नाही.

ठिकाण :- जत

दिनांक २९-५-०७

[श्री. विजय हणमंत जाधव .]

NGO

# ALL INDIA HUMAN RIGHTS ASSOCIATION (AIHRA)

(मानवी हक्क, दिल्ली) Reg. No. # S/20441/89

India's first registered Human Rights & Non profitable Organization

"FOR THE PROTECTION OF HUMAN RIGHTS"

National off.: R-178, Street # 8, Ramesh Park, Laxmi Nagar, Delhi 110 092
Admn. Off.: 1/24, 2nd Floor, St. # 2, Lalita Park, Laxmi Nagar, Delhi 110 092
West Mah. R. Off. : II nd Floor, Above Ajit Bank, Pune-Satara Road, Dhanakwadi, Pune 411 043
Tel.: (020) 24364709, 9322321445, 9422501911
... Mangal Karyalaya, Vidya Nagar, Jath 416 404., Tal. Jath. Dist. Sangli Phone (02344) 246266

Date २९-०५-०७

जोडपत्र "अ"

[नियम ३ पहा]

प्रति,

माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी-वर्ग-१
पंचायत समिती जत ता. जत

[१] अर्जदाराचे संपूर्ण नांव :- श्री. विजय हणमंत जाधव

[२] पत्ता :- सुदर्शन बंगला शिवनगर कॉलनी बालविद्यामंदीर जवळ जत ता. जत

[३] हव्या [ आवश्यक] असलेल्या माहितीचा तपशिल

[एक] माहितीचा विषय :पं. स. कडील चालकांच्या नियुक्त्या ;

[दोन] ज्या कालावधी संबधात माहिती हवी असेल तो कालावधी -१-४-२००६ ते आज अखेर

[तीन] हव्या [आवश्यक] असलेल्या माहितीचे वर्णन -

[१] आपल्या प्रशासन विभागाकडे आस्थापना सुचिनुसार किती चालकांची रिक्त पदे भरलेली आहेत. ?

[२] किती चालकांची पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत ?

[३] किती वाहन चालकांची आपल्या पं. स. कडे प्रतिनियुक्ती करणेत आलेली आहे. ?

[४] किती वाहन चालक सद्यस्थीतित पं. स. च्या कार्यालयात बसून आहेत. ?

[५] किती वाहन चालकांच्या नियुक्त्या उपलब्ध वहाना केलेल्या आहेत. ?

[६] एकाच वहानावर दोन चालकांच्या नियुक्त्या करता येतात काय ? तसेच जि. प. ने तसे आदेश दिलेले आहे काय ?

नोंदणी लिपिक (प्रशासन) पंचायत समिती, जत
२९/५/०७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नेताजी नरोबा ओमासे
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, सांगली, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी
श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नेताजी नरोबा ओमासे
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, सांगली, जि. सांगली तर्फे प्रतिनिधी श्री. संजय विश्वास पवार

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी
श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग, ता.मिरज, जि.सांगली
श्री. अशोक विठ्ठल ओमासे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.४.४.२००९ रोजी अपिलाचा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीसही अपीलकर्ता गैरहजर होते.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती मागणीचे आपले रजिस्टर्ड टपाल स्वीकारले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली, यांच्याकडे अपील केल्यानंतरही माहिती मिळाली नाही, म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. नेताजी नरोबा ओमासे यांनी केली.

श्री. ओमासे यांचा दि.४.४.२००७ चा अर्ज दि.१०.४.२००७ रोजी मुख्याध्यापकांकडे वर्ग करण्यात आला. मुख्याध्यापकांनी लेखी कळवूनही श्री. ओमासे माहिती घेऊन गेले नाहीत, म्हणून मुख्याध्यापकांनी टपालाने माहिती पाठविली. आपल्या कार्यालयाकडे व या आश्रमशाळेकडे श्री. ओमासे सातत्याने माहिती मागत असतात. माहिती तयार असल्याचे कळविल्यानंतर घेऊन जात नाहीत, व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, आणि राज्य माहिती आयोग यांच्याकडे अपिले करतात. दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे व दि.२२.१०.२००८ रोजी पुणे येथे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी श्री. ओमासे हजर नव्हते. सुनावणीलाही ते हजर राहत नाहीत. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी प्रत्येकवेळी उपस्थित राहतात. जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने ते हे करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री. अशोक विठ्ठल ओमासे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. संजय विश्वास पवार यांनी लेखी व तोंडी नमूद केले. दि.२७.१२.२००६ ते दि. २३.८.२००७ या काळात श्री. ओमासे यांनी केलेल्या पाच अर्जांचा तपशील विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सांगली श्री. दिपक घाटे यांनी सादर केला. श्री. नेताजी ओमासे यांना संस्थेचे सभासदत्व हवे असल्यामुळे ते दबाव आणत असून त्यांची

प्रतिमा लक्षात घेता संस्था सभासदत्व देणार नाही, असे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्थेचे श्री. अशोक विठ्ठल ओमासे यांनी केले. परस्परातील वादासाठी दबावाचे साधन म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करु नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जिल्हा सांगली
अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
वाळवा इस्लामपूर,
जिल्हा सांगली
उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
वाळवा, इस्लामपूर,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५/२००९ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७/१/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २/०३/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/०३/२००९ |
| ५ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/०५/२००९ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इस्लामपूर यांचे दि १३/१०/२००८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात खुलासेवजा माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता , श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इस्लामपूर यांचे दि.१३/१०/२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत कोणती चौकशी करण्यात आली त्याची छायांकित प्रत, अशा प्रकारे चौकशी करण्याचे अधिकार आपणास ज्या

कायद्याने आहेत त्या कायद्याची छायांकित प्रत अशा एकूण ०६ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, इस्लामपूर यांच्याकडे मागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.५.२०९ रोजी अपील केले आहे. दरम्यानच्या काळात तहसील कार्यालय, वाळवा यांच्याकडून माहिती मिळाली, कोणतीही तक्रार नाही, असे नमूद करुन श्री.जंगम यांनी अपील निकाली काढण्याबाबत दि. ३/६/२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.०९-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. भिमराव यशवंत माळी
मु.पो.मालगाव, ता.मिरज,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१ सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८९ / सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक | २२-१०-२००८ |

३ उपस्थिती

अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली
श्री.के.एच.अन्सारी

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१, सांगली
श्री.व्ही.एस.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/७/०७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/८/०७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/९/०७ |
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४/९/०७ |
| ७ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती** :- सेवाअंतर्गत पदोन्नती, वेतनश्रेणी, वेतननिश्चिती विकल्प , इ. मुद्दयांवर प्रश्नार्थ भाष्य विचारणारी माहिती विचारली आहे. | |

## विवेचन

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१ , सांगली यांनी दि. २१/१०/२००८ रोजी आयोगास सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाबासाहेब हरिबा नरळे
मु.पो.आष्टा (विलासराव शिंदेनगर) — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
गांधी एज्युकेशन सोसायटी, पलूस, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
गांधी एज्युकेशन सोसायटी, पलूस, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.४.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. बाबासाहेब हरिबा नरळे<br>मु.पो.आष्टा (विलासराव शिंदेनगर) | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

शैक्षणिक पात्रतेप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करुन प्रस्ताव शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद सांगली यांचेकडे पाठविणेबाबत

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२९.४.२००९ रोजी अपिलाचा सुनावणी घेण्यात आली.

गांधी एज्युकेशन सोसायटी, कुंडल या संस्थेने आर्ट मास्टर वेतनश्रेणी मंजूर करुनही व शिक्षण खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागूनही त्यानुसार वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गांधी एज्युकेशन सोसायटी, कुंडल यांना दंड करावा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सांगली, शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनीही आपल्या अर्जाची दखल घेतली नाही व आपल्याला माहिती मिळाली नाही, असे अपीलकर्ता श्री. बाबासाहेब हरिबा नरळे यांनी अपील अर्जात म्हटले होते. आपण मागितलेल्या सर्व कागदपत्रांची संस्थेने पूर्तता केली असून आर्ट मास्टरची वेतनश्रेणी दिली आहे. त्यामुळे कोणतीही तक्रार राहिलेली नाही, अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन श्री. नरळे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२० .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंद बापूसाहेब शिंदे
१५१०, लक्ष्मी गल्ली, मु.पो.कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली, संचलित,
यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आनंद बापूसाहेब शिंदे
१५१०, लक्ष्मी गल्ली, मु.पो.कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली, संचलित, यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.वसंत दिनकर पाटील

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,<br>यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर<br>डॉ.मिलिंद मोहन गोडबोले | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम'त या अपिलाचा समावेश होता.उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर या महाविद्यालयाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे उत्तर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिले. त्यावेळी संस्थेचे अपिलीय प्राधिकारी असलेल्या संस्थेच्या अध्यक्षांनी अपील स्वीकारले नाही व आपल्याला कोणतीही माहिती दिलेली नाही. महाविद्यालयाने माहिती नाकारल्यानंतर आपण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे माहिती मागितली. त्यांनी महाविद्यालयाकडून माहिती घेण्यास कळविले. तसेच अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्या नेमणुका करुन दर्शनी भागावर फलक लावून अहवाल सादर करण्याबाबत सूचना महाविद्यालयाला दिल्याचे विद्यापीठाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला कळविले.

शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार विनाअनुदान महाविद्यालयांनाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे. महाविद्यालयाला सरकारने लीजने जमीन दिलेली आहे. तसेच विद्यार्थी संख्येनुसार पुस्तके, कपाटे आदींसाठी केंद्रिय व राज्य सरकारच्या निधीमधून समाजकल्याण विभागामार्फत महाविद्यालयाला अनुदान दिले जाते. त्यामुळे हे महाविद्यालय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सार्वजनिक प्राधिकरण ठरते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आनंद बापूसाहेब शिंदे यांनी केले.

महाविद्यालयाला शासकीय अनुदान मिळत नाही. शासकीय निधीतून मिळालेली पुस्तके मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाच दिली जातात. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नियंत्रण महाविद्यालयावर आहे. शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केल्याप्रमाणे शुल्क घेणे महाविद्यालयावर बंधनकारक आहे. सरकारने लीजवर जमीन दिलेली आहे, ही काही प्रमाणात मदत असली तरी, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मध्ये 'शासनाकडून भरीव आर्थिक मदत' मिळणे ही सार्वजनिक प्राधिकरण ठरण्यासाठी प्रमुख आवश्यकता आहे. लीजवर जमीन सरकारने देणे किंवा ग्रंथालयासाठी काही अनुदान देणे ही 'भरीव आर्थिक मदत' म्हणता येणार नाही, म्हणून आपल्या महाविद्यालयाला हा कायदा लागू नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन संस्थेचे प्राचार्य डॉ.मिलिंद मोहन गोडबोले आणि मानद सचिव श्री.वसंत दिनकर पाटील यांनी केले.

श्री.शिंदे यांनी स्वतःच्या सेवेविषयीची माहिती मागितली आहे. वस्तुतः नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसारही त्यांची स्वतःची माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो की नाही, असा कायदेशीर मुद्दा उपस्थित करुन संस्था ही माहिती नाकारत आहे. महाविद्यालयाला सरकारने सवलतीने दिलेली जमीन ही मोठी व भरीव मदत आहे. रोख रकमेच्या स्वरुपातच मदत असणे, असा कायद्याला अभिप्रेत असणारा अर्थ नाही. तसेच शासनाच्या शुल्क निर्धारण समितीतर्फे या महाविद्यालयाचेही शुल्क ठरविले जाते. केंद्र व राज्य सरकारच्या योजनेतून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अनुदान मिळते. या बाबी लक्षात घेता संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते व तिने माहिती देणे आवश्यक आहे, असे मौखिक आदेश आयोगाने

सुनावणीच्या वेळी दिले होते. त्यानुसार कार्यवाही झाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता डॉ.आनंद बापूसाहेब शिंदे यांनी दि.२१.८.२००९ व दि.६.१०.२००९ च्या पत्रान्वये केली आहे. आयोग त्याची दखल घेत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद मोहन गोडबोले यांनी अपीलकर्ता श्री.आनंद बापूसाहेब शिंदे यांना दि.१०.११.२००९ पर्यंत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा, यानुसार पूर्तता न झाल्यास ते पुढील कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ .१०.२००९**